Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ६२ ] सोमवार, नोव्हेंबर १०, २०२५/कार्तिक १९, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८८४.

**आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल**

**सूचना**

क्रमांक मनपाना-नरवि-१७११-२०२५.—

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्रमांक टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र. ३००(अ)-९७ - नवी -९, दिनांक ०७ जानेवारी २००० अन्वये मंजुर झाली असून ती दिनांक ०१ मार्च २००० पासून अंमलात आली आहे तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्रमांक टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.२००-नवि-९, दिनांक १० सप्टेंबर, २००१ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक २१ सप्टेंबर, २००१ पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्रमांक टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६-नवि-९ दिनांक. २७ फेब्रुवारी, २००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तथापि, शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्रमांक टिपीएस-२४१९-१४१९- प्र.क्र. १५४/२०१९-नवि-९, दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ अन्वये संपूर्ण क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासनाकडील शासन निर्णय क्रमांक टिपीएस-२४१९-प्र.क्र.-१५४ (भाग-१)-२०१९-नवि-९, दिनांक ०९ एप्रिल २०२१ अन्वये ७ योजनेतील स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील क्षेत्र वगळून पुन्हा त्या क्षेत्राकरीता नागपूर सुधार प्रन्यासला "नियोजन प्राधिकरण" म्हणून घोषित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, मौजा- वाठोडा येथील खसरा क्रमांक २६ पैकी, २७ ते ४० पैकी, १.४५९२ हेक्टर क्षेत्राची जागा आरक्षण क्र. ME-५७ शॉपींग सेंटर करीताची राखीव असून उक्त आरक्षित जागेकरीता नागपूर सुधार प्रन्यास हे समूचित प्राधिकरण आहे. तसेच सदर जागेकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. शासनाने निर्णय क्रमांक टिपीएस-२४२०-८०६-प्र.क्र. ९४-२०२२-नवि-९, दिनांक २०.०५.२०२५ अन्वये मौजा- वाठोडा येथील आरक्षण क्रमांक ME - ३१ टेलिफोन ते ME-५८ खेळाचे मैदान पर्यंतच्या १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याऐवजी तसेच खसरा क्र. १७ व १८ मधून रिंगरोडला जोडणाऱ्या १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याऐवजी ३६.०० मी रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करणेच्या फेरबदल प्रस्तावास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (२) अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. उक्त ३६.०० मी रूंद विकास योजना रस्त्यामुळे आ.क्र. ME - ५७ शॉपींग सेंटर करीता राखीव जागेमधील सुमारे ०.२७ हे क्षेत्राची जागा बाधीत होत असल्याने, आता आरक्षण क्रमांक ME- ५७ शॉपींग सेंटर करीताचे राखीव क्षेत्र १.१८९२ हेक्टर एवढे शिल्लक राहते.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना सूधारीत मध्ये मौजा- वाठोडा येथील खसरा क्र. २६ पैकी, २७ ते ४० पैकी आरक्षण क्रमांक ME-५७ शॉपींग सेंटरकरीता शिल्लक राखीव १.१८९२ हे. क्षेत्राच्या आरक्षणाचे नामाभिधानात बदल करून सिव्हीक सेंटर/कम्युनिटी हॉल व कल्चरल सेंटर करीता राखीव ठेवणेबाबत मंजूर विकास योजना सूधारीत मध्ये बदल करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याचे ठरविले आहे व यासाठी नागपूर महानगरपालिकेने ठराव क्रमांक ५५-मनपा-प्रशासक, दिनांक २० ऑक्टोबर, २०२५ नूसार उपरोक्त फेरबदलाची कार्यवाही मंजूरी प्रदान केली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त फेरबदल दर्शविणारा नागपूर शहराच्या सूधारीत विकास योजनेचा भाग नकाशा महानगरपालिकेच्या उपसंचालक, नगर रचना विभाग, श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, बी व सी विंग, तिसरा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१ या कार्यालयात कामकाजाचे सर्व दिवशी कार्यालयीन कामकाजाचे वेळेत जनतेच्या निरीक्षणासाठी खुला ठेवण्यात आला आहे. तरी नागरीकांना सुचित करण्यात येते की, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशीत झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे कालावधीत विकास योजनेतील उपरोक्त फेरबदलाच्या संबंधात ज्या सूचना किंवा हरकती उपसंचालक, नगर रचना, नागपूर महानगरपालिकेकडे प्राप्त होतील त्यावर महानगरपालिकेकडून सुनावणी देण्यात येईल. तद्‌नंतर फेरबदलाचा प्रस्तुत प्रस्ताव नागपूर महानगरपालिकेकडून शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

**डॉ. अभिजित चौधरी,**
आयुक्त तथा प्रशासक,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

नागपूरः
दिनांक ३ नोव्हेंबर, २०२५.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८८५

## BY COMMISSIONER AND ADMINISTRATOR, NAGPUR MUNICIPAL CORPORATION

MODIFICATION UNDER SECTION 37 OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966

*NOTICE*

No. NMC-TPD-1711-2025.–

Whereas, the Revised Development Plan of Nagpur City prepared under the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act,1966, section 31*(1)* has been partially sanctioned by the Govt. *vide* Urban Development Department Notification No. TPS-2496-2643-CR-300(a)-97-UD-9, Date. 7th January, 2000 and came into force from 1st March, 2000. Excluded part of development plan has been sanctioned *vide* Govt. Notification No. TPS-2400-1628-CR-200-2000-UD-9, Dated. 10th September, 2001 and came into force from Date. 21st September, 2001. Also Nagpur Municipal Corporation has been declared as the "Planning Authority" for Nagpur City

except the area covered under seven schemes *vide* Govt. Notification No. TPS-2401/855/CR-76/UD-9, Date. 27th February, 2002 and Nagpur Municipal Corporation has been declared as "Planning Authority" for Nagpur City areas coverd under seven scheme *vide* Government Notification No.TPS-2419/1419/CR -154/-2019-UD-9, Dt. 27th August, 2019 and aslo Nagpur Municipal Corporation has been declared as "Planning Authority" for Nagpur city except the areas covered under seven scheme *vide* Govt. Notification No. TPS-2419/1419/C.R. 154(Part-1)/2019-UD-9, Dt. 09th April, 2021. For the said proposal Nagpur Municipal Corporation is "planning authority!

In the sanctioned Revised Development Plan of Nagpur city, Mouza - Wathoda, land bearing Khasra No. 26 (part) and 27 to 40 (part), admeasuring 1.4592 hectares, is reserved for Reservation No. ME-57 "Shopping Centre." The appropriate authority for the said Reservation is Nagpur Improvement Trust (NIT) and planning authority is Nagpur Municipal Corporation (NMC) for the same. As per Government Notification No. TPS-2420-806-CR-94-2022-UD-9, dated 20th May, 2025, approval has been granted under Section 37*(2)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, to the modification proposal for replacing the 18.00 M. wide Development Plan road from Reservation No. ME-31 (Telephone) to ME-58 (Playground), and also replacing the 18.00 M. wide Development Plan road connecting the Ring Road through Khasra Nos. 17 and 18, with a newly proposed 36.00 M. wide Development Plan road. Due to the said 36.00 M. wide Development Plan road, approximately 0.27 hectares of land from the area reserved for Reservation No. ME-57 (Shopping Centre) has been affected, so balance area of 1.1892 hectares under the said reservation No. ME-57 (Shopping Centre).

Now, in the sanctioned Revised Development Plan of Nagpur City, it has been decided to modify the nomenclature of Reservation No. ME-57, situated at Mouza - Wathoda, Khasra No. 26 (part) and 27 to 40 (part), for the remaining reserved area of 1.1892 hectares from "Shopping Centre" to "Civic Centre/Community Hall and Cultural Centre" For this purpose, The Nagpur Municipal Corporation desirous of making such modification u/s 37 of Maharashtra Regional and Town Planning Act 1966, Nagpur Municipal Corporation has passed the administrative Resolution No. ५५-मनपा-प्रशासक, Dt. 20-10-2025 for the aforesaid modification.

And there after the part plans of Development Plan of Nagpur showing the aforesaid modification is displayed in the office of Deputy Director, Town Planning Deptt. of Nagpur Municipal Corporation, Shree Chhatrapati Shivaji Maharaj Administrative Building, B & C wing, third floor civil line, Nagpur- 440001 for inspection by public during office hours on all working days. The suggestions and objections in writing which may be received by Deputy Director, Town Planning Dept. of Nagpur Municipal Corporation, Shree Chhatrapati Shivaji Maharaj Administrative Building, B & C wing third floor civil line, Nagpur in respect of the said modification to the Development Plan within a period of 30 days from the date of publication in the official Gazette, will be considered to hearing by the Municipal Commissioner before submitting the said modification proposal, to the State Govt, for sanction.

Dr. ABHIJIT CHAUDHARY,
Commissioner and Administrator,
Nagpur Municipal Corporation, Nagpur.

Nagpur :
Dated the 3rd November, 2025.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८८६

## आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, यांजकडून

### महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५१ सुधारित चे कलम ३ (१) अन्वये शुध्दीपत्रक

**वाचा :-** महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण भाग एक-अ नागपूर विभागीय पुरवणी दिनांक. १२ डिसेंबर, २०२२.

क्रमांक ७३०-साप्रवि-एम-२०२५.—

राज्यातील प्राप्त व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्याकरिता तसेच स्थानिक नागरिकांना प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दुष्टीकोनातून यापूर्वी वेळोवेळी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ मधिल कलम ३ (१) नुसार विविध सेवा अधिसूचित करुन वाचा दिनांक. १२ डिसेंबर, २०२२ प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

त्याअनुंषगाने संदर्भीय या अधिसूचने अन्वये यापूर्वी करण्यात आलेल्या अग्निशमन विभागातील यापुर्वी प्रसिध्द झालेल्या खालिल प्रमाणे सेवा संदर्भिय अधिसूचनेतील सेवा अनुक्रमांक ३४ मध्ये म.न.पा. स्तरावर निश्चित केलेली दर व पदनिर्देशित अधिकारी उपमुख्य अग्निशमन अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी- मुख्य अग्निशमन अधिकारी ( अग्निशमन विभाग), द्वितीय अपिलीय अति. आयुक्त (शहर) ( अग्निशमन विभाग) नोंद झाली असून त्याऐवजी उक्त सेवेसाठी विहीत दर व पदर्निर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी, द्वितीय अपिलीय अधिकारी खालिलप्रमाणे अधिसूचित करित आहे.

### तपशील

### अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग

| सेवेचे अधिसुचनेतील अ.क्र. | सेवेचे नाव | पुर्वीची निश्चित केलेली फी | पुर्वीचे पदनिर्देशित अधिकारी | पुर्वीचे प्रथम अपिलीय | पुर्वीचे द्वितीय अपिलीय | सुधारित फी | सुधारित पदनिर्देशित अधिकारी | सुधारित प्रथम अपिलीय पदनिर्देशित अधिकारी | सुधारित द्वितीय अपिलीय पदनिर्देशित अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| ३४ | अग्निशमन ना-हरकत दाखला देणे | म.न.पा. स्तरावार निश्चित केलेले दर | उपमुख्य अग्निशमन अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी | अति. आयुक्त (शहर) (अग्निशमन विभाग) | महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिव संरक्षक उपाययोजना सुधारणा अधिनियम २०२३-II | मुख्य अग्निशमन अधिकारी | उपायुक्त अग्निशमन अधिकारी | अति. आयुक्त अग्निशमन अधिकारी |
| ३५ | अग्निशमन अंतिम ना-हरकत दाखला देणे | म.न.पा. स्तरावार निश्चित केलेले दर | उपमुख्य अग्निशमन अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी | अति. आयुक्त (शहर) (अग्निशमन विभाग) | म.न.पा. स्तरावार निश्चित केलेले दर | मुख्य अग्निशमन अधिकारी | उपायुक्त अग्निशमन अधिकारी | अति. आयुक्त अग्निशमन अधिकारी |

**डॉ. अभिजित चौधरी** (भा.प्र.से.),
आयुक्त तथा प्रशासक,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

नागपूरः
दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.